
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५८९




# प्रवासाच्या कविता

व सं त बा प ट

REFBK-0023610
REFBK-0023610

मौज
प्रकाशन

REFBK-0023610
REFBK-0023610

# प्रवासाच्या कविता

वसंत बापट

मौज प्रकाशन : ३००

पहिली आवृत्ती : २५ जुलै १९८२

© १९८२, वसंत बापट

मुखपृष्ठ :
र० कृ० जोशी
सुषमा शिंदे

प्रकाशक :
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मूल्य : सोळा रुपये

तीन
तपांच्या
सहप्रवासिनीस—

खांद्यावर पडशी .... .... .... .... १
वाटचुकल्या देवदत्ताला .... .... २
अमेरिके ! मी आलो .... .... .... ३
म्हणतात, आणि तेही .... .... .... ४
अमेरिके अमेरिके दार.... .... .... ५
हवाई बंदरातले सवाई.... .... .... ६
न्यूयॉर्क महानगराधिनगर .... .... ७
रस्ते आणि रस्ते .... .... .... .... ८
शंभर-मजली हवेलीचा .... .... ९
जेफर्सनचा मानवतेला .... .... .... १०

अर्लिंग्टनला गेला नाहीत? .... .... ११
अटलांटाच्या शिवेवरती .... .... १२
हॅन्स क्रिश्चन अँडर्सनच्या .... .... १३
प्रिय वॉल्ट, .... .... .... .... .... १४
अंब्रा पिकतोऽऽ .... .... .... .... १५
पॅसिफिक! तुला सगळे .... .... १६
जलपरी उसळली वरी.... .... .... १७
आटपाट औरसचौरस .... .... .... १८
विसावे शतक सोडून .... .... .... १९
जगामधल्या जुगाऱ्यांची .... .... २०
बाळपणापासून जेनी .... .... .... २१
स्वदेशाहून तिप्पट मोठ्या .... .... २२
एकच आले उत्तर.... .... .... .... २३
ग्रँड कॅन्यॉन करायची रीत.... .... २४
तळघरात दडवलेले .... .... .... २५
शिकागो! मला तुझी भीती.... .... २६
"कबूल आहे, अटलांटिकच्या .... २७
"नव्या जगाच्या छाताडावर .... २८
कर्तव्याच्या भावनेने मघाचा ... २९
मंद सूर्यास्ताची वेळ .... .... .... ३०
औत घटकेची यात्रा .... .... .... ३१
ती म्हणाली, "आम्ही.... .... .... ३२
तो म्हणाला, "इंडियात .... .... ३३
अमेरिकन शेतकरी भाऊ! .... .... ३४
पाणी! आदिमायेच्या .... .... .... ३५
अलाण्याच्या ब्रशावरती .... .... ३६
यलोस्टोन नॅशनल पार्क .... .... ३७
भटो भटो काय आणलंत .... .... ३८
बायबाय अमेरिका .... .... .... ३९
पाठीवरचे गाठोडे चिजांनी .... .... ४०

ईश्वरसाक्ष शपथ घेतो :
माणसाच्या मनाची
छळणूक
जे जे करतील
त्यांच्याशी मी झुंजत राहीन,
ते माझे वैरी आहेत
ज्याने माणसाला
जीवन दिले आहे
त्यानेच दिले आहे
वरदान स्वातंत्र्याचे—

थॉमस जेफरसन

खांद्यावर पडशी घेऊन
देवदत्ताने घराचे दार ओढून घेतले
तेव्हा मध्यरात्र झाली होती.
तारांगण गजबजलेले होते
ते त्याने पाहिले नाही.
नाही पाहिले बाजारचे उरलेले दिवे
नाही पाहिली माजघरातली निवांत समई.
आवंदा आवक बरी झाली होती
लोटकी रिकामी नव्हती.
खाटल्यावरच्या गोधडीला बऱ्यापैकी ऊब होती.
मुख्य म्हणजे भरोसे, त्यांची काही वाण नव्हती.
देवदत्त विसरला साधे अंकगणित
सोपे तोंडचे हिशेब दरसाल दरशेकड्याचे.
होती नव्हती पुरचुंडी कनवटीला लावून
देवदत्त निघाला
स्वप्नतीर्थांच्या अनोख्या यात्रेला....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६९

# २

वाटचुकल्या देवदत्ताला अल्लाद उचलतो
रंगीत संगीत जादूचा गालिचा.
वरती खालती अथांग निळे काचगोल
मधे पडदा अरळतरळ कापुसकोंडा....
त्रिपुरासुराला नुकसानभरपाईदाखल मिळाले
ते हे चवथे नगर (भविष्यपुराणातले)
अविंध्य अलमिनीचे अभंग काचेचे.
अवतीभवती सराईचे सराईत
आणि मधे धास्तावलेला देवदत्त.
हे मीननयन चपलचरण हवाई सुंदरींनो
गौरांगपूजेचे सोपस्कार संपल्यावर
या काळ्या आदमीलाही गल्लासभर पाणी द्या.
अधरोष्ण सरबताचा एखाददुसरा घोट चालेल
किंवा ठेवा कपाळावर तुमचा जादूचा पंजा.
बेटा देवदत्त, एकदम डोळे मीट
म्हणजे मावळेल मेंदूमधले इंद्रधनुष्य.

अमेरिके! मी आलो आहे, मी तुझा देवदत्त
तहानलेल्या डोळ्यांचा अनाहूत अतिथिविशेष.
लाल निळ्या गालिचांचे बिंडे ठेव गुंडाळून
उलगडून ठेव मात्र रंगबिरंग सतरंजी....

....उदीपिवळ्या मुरमाडाचे कातरलेले डोंगरकडे
अफाटलेल्या डोळ्यांमधे न मावणारी पाटनगरे
फ्लॉरिडाभर दडवलेले तळकोकण हिरवेगार
अपरंपार प्रवाहांच्या बारमाही पाताळगंगा
वाळवंटात उभवलेली आदिम अद्‌भुत मायापुरी
आमच्याकडून चोरून नेऊन रुजवलेले दंडकारण्य
मखमली रुमालाने आच्छादलेल्या गुलटेकड्या
हॉलिवुडची गुलछड्यांची गुलछबूंची यक्षभूमी
शिसवी आणि हस्तिदंती काळीगोरी जमनागंगा
आभाळात घुसवलेले काळेकबरे सोनमिनार....

थोडक्यात म्हणजे तिळा तिळा उघड तुझी गुप्त गुंफा
येणारा तो आला आहे....म्हणून म्हणतो दार उघड!

# ४

म्हणतात, आणि तेही पंचम वेद जाणणारे,
न्यूयॉर्कच्या महाद्वारी जागृत स्वातंत्र्यदेवी
भडकल्या गलबतांना देते इशारा.
या पाषाणमूर्तीच्या हातातली मशाल
हाच या दुनियेतला सर्वोच्च दीपस्तंभ.
या मशालीची दाहकता अलौकिक....
तिनेच चेतवला हिंदी महासागर
तिनेच पेटवला अगदी पहिल्याप्रथम
आफ्रिकन जंगलातला सनातन अंधकार.
म्हणतात या मशालीत जळते ते शुद्ध रक्त.
म्हणतात आपटून बॉस्टनच्या किनाऱ्यावर
प्रळयलाट परतली चहाच्या रंगाची
तेव्हा अनोखी भरती आली सात सागरांना.
आणि फिलाडेल्फियाची नारोशंकरी घणघणली
तेव्हा झंकारलेल्या ध्वनींच्या वर्तुळांत
सहज सामावला अवघा भुवनगोल.

अमेरिके अमेरिके दार उघड, बया दार उघड
पाताळलक्ष्मी दार उघड
सुवर्णगौरी दार उघड
वॉलस्ट्रीटवाली दार उघड
शिकॅगोकाली दार उघड
वॉशिंग्टनचंडी दार उघड
हॉलिवुडरंडी दार उघड
त्रिभुवनमोहिनी डॉलरवाहिनी दार उघड, बया दार उघड

जॉन बुलचे तुवां शिंग मोडले
फराशिसांचे फरे तोडले
स्पॅनियर्डबिनियर्ड सारे झोडले
स्वातंत्र्याचे तुवां शिंग फुंकले
महायुद्ध डब्बल तुवां जिंकले
हिटलरनाशिनी दार उघड
स्तालिनमर्दिनी दार उघड
भवन-सुंदरी भुवन-भयकरी दार उघड, बया दार उघड

# ६

हवाई बंदरातले सवाई घाशीराम
डोळ्यांत डोळे खुपसून काळजाचा तळ बघतात.
एकाच टिचकीने डोक्याचा नारळ जोखून
धोक्याचा अंदाज घेतात गेंगाण्या सवालांनी.
दोन धक्के दोन शिक्के. त्यांच्यावरती एक ओ० के०
देवदत्त जाऊ शकतो अज्ञाताच्या वेशीमधून.
(सहीसलामत लोणच्याचा बंद डबा सुटला साला
एवढ्यानेच देवदत्त हर्षित का काय ते झाला.)

हेच तर ते महानगर स्वप्नामधे पाहिलेले
रस्ते केवळ आडवे इथे, बाकी सारे उभे उंच
अंतर्बाही गजबजलेले तरी कसे निवांतसे
टिकटिकीचे तालवाद्य पडद्यामागे लपवलेले
पडद्यापुढे वाहनांची लय कशी दरोबस्त
कुठे याचा सूत्रधार? राजा कोण या वारुळात?
देवदत्ता बरे तुझ्या डोक्यावरती टोपी नाही
डोईवरची टोपी पडता हसू येते मुंग्यांनाही!

न्यूयॉर्क महानगराधिनगर अजब अवतार
न्यूयॉर्क म्हणजे मुंबई गुणिले कुतुबमिनार
न्यूयॉर्क म्हणजे एका म्यानात चार नगरी
न्यूयॉर्क म्हणजे प्रलयकाळची काळमगरी
न्यूयॉर्क एक भुलभुलैया जंतरमंतर
न्यूयॉर्क हेच गगनधरेमधले अंतर
न्यूयॉर्क एक माणूसशून्य माणूसमोहोळ
क्षीरसागर–काळासमुद्र–संगम–ओहोळ

न्यूयॉर्क म्हणजे समुद्र नद्या पूलच पूल
न्यूयॉर्क जित्या भुताटकीची भुयारीहूल
न्यूयॉर्क म्हणजे तोंडामधे दाही बोटे
रस्ते चुकणे वेळ हुकणे फुक्कट खेटे
न्यूयॉर्क एक उजवेडावे चक्री वादळ
न्यूयॉर्क म्हणजे न्यूयॉर्क म्हणजे न्यूयॉर्क केवळ
न्यूयॉर्क जोवर देवदत्ताने पाहिले नव्हते
तोवरती ते त्याच्या मेंदूत मावले होते!

८

रस्ते आणि रस्ते आणि रस्ते
रस्त्यांमधून रस्त्यांखालून रस्त्यांवरून.
एकेका रस्त्यावरती सहा रस्ते रांगा करून.
रस्ते : शिस्तशीर. समंजस. सांभाळणारे.
रस्ते : रस्त्याला फुटणारे. सफाईने सुटणारे.
रस्ते कसरतवाले कमानदार.
इमानदार. नाकासमोर चालणारे. शानदार.
दाट वस्तीवरून अलगद झेपावणारे.
रस्ते फिरस्ते. उलटसुलट वाहणारे.
लाल हिरव्या डोळ्यांनी सदा सख्त पाहणारे.
रस्ते कठीण काचेचे. बिनटाचेचे वाहननिष्ठ.
माणूसघाणे, कुर्रेबाज महाशिष्ट.
गोठलेले कालवेच हे अटलांटिक ते पॅसिफिक
मेक्सिको ते अलास्का उभ्या रेषा टेरिफिक
यांकी
तुझ्या देशाचीदेखील चटेरीपटेरी झाकी !

शंभर-मजली हवेलीचा पाया किती उथळ बरे
आकाशाचा आधार म्हणून उभी आहे एवढे खरे
तळघरात भरली आहे स्फोटक दारू काळीभोर
अलमिनीच्या चौकटी अन् काचा म्हणजे नसता घोर
सरकणारे सात जिने सुपरफास्ट वीजपाळणे
इलेक्ट्रॉनिक किल्लीवाले कचकड्याचे बुलंद खेळणे
आलीशान जाळी विणतात खानदानी कुशल कोळी
वरच्या पाट्या काही असोत, खोल्याखोल्यांत टाकसाळी
(व्हिएत)नामी चिखलावरती सुवर्णाचे सात थर....
सावध ! कुठून ऐकू आला कोवळ्या आक्रोशाचा स्वर ?
शिखराजवळ वळचणीला किती काळी कबूतरे
इतक्या उंच त्यांच्या छातीत असे कसे घुसले छरे ?
अस्मान खरेच ठेंगणे झाले, आता यांचा एक विचार
छपरावरून केव्हा गाठू अस्मानाचा पैलपार
अरे कोणी तरी धावा, सांगा जरा सबूर करा
अस्मानात जाण्यापूर्वी आधी भुई घट्ट धरा !

## १०

जेफर्सनचा मानवतेला महामंत्र विद्युद्गर्भ
लिंकनच्या कारुण्याला सामर्थ्याचा लोहसंदर्भ
व्रतधारी वॉशिंग्टनचे खड्ग सदा विजयोन्मुख
अँड्र्यू जॅकसनकृत अजरामर मुक्तिकौतुक

माझा चश्मा इतिहासाचा अपारदर्शी भिंगांचा
पापणीआड उसळणारा कल्लोळ स्वप्नरंगांचा
यांतून बाकी उरेल तेच वॉशिंग्टन खरे असणार
चश्म्याशिवाय स्वप्नांशिवाय मला जग कधी दिसणार !

हा पहा अमेरिकन अध्यक्षाचा धवल-महाल
दुनियेचा केंद्रबिंदू कॅपिटॉल, तो पुढे पहाल
तसाच बघून ठेवा भव्य स्मिथसोनियन अजबखाना
चेरींवरला वसंतबहार डोळ्यांमध्ये भरून घ्या ना

पाहता पाहता सर्व पाहिले, पहायचे ते दिसले नाही
डोळे फसले कान फसले मन मात्र फसले नाही
सुवर्णाच्या मंदिराचा कळस गेला गगनीं थेट
पाया मात्र वॉटरगेट !

# ११

आर्लिंग्टनला गेला नाहीत ? जाऊन या
पाहून या की सर्वांत मोठे कबरस्थान
(अमेरिकेत एक मात्र बरे असते....
सर्व काही....सर्वांत महान....सर्वांत लहान)

आर्लिंग्टन, सोजिरांची दफनभूमी,
गोजिरवाण्या तारुण्याचे पूर्णविराम.
हजार एकर एकच पीक पांढरेधोप
रोपावरती कणीस कुठे धरत नाही.
थेंबथेंब पाणी देतात आयाबहिणी
त्याचा पुढे मागमूसदेखील उरत नाही.

कोण म्हणतो अमेरिकेत समता नाही ?
त्याला सांगा आर्लिंग्टनला जाऊन पहा
सैनिक आणि सेनानायक छोटेमोठे
एका मातीत झोपी गेलेत सरसहा
युद्ध नामक घोरांदर संकुलयज्ञात
प्रमाण पडते एका ज्ञातास दहा अज्ञात

अटलांटाच्या शिवेवरती उभा आहे
एक अपूर्व पर्वतराज. आमूलाग्र एकशिला
मुळामधे हा आहे शेषाचा आधारविशेष
अजस्र अजंगम अनादी आदिकूर्म !
(अमेरिकन विद्वानांना अर्थात याचा पत्ता नाही !)

दिव्यदृष्टी देवदत्त ! त्यालाच दिसू शकले
अष्टचरण कच्छपाचे भूमीमधले चार चरण
दक्षिण कॅरोलायनाच्या लायनीत दोन रोवलेले
एक टेकवलेला टेक्सासला आणि एक
सभोतीच्या सरोवरात....अतळ नितळ तळघरात

अज्ञान बाकी आनंदमय ! हे इथे पटते खरे
अथांग कासवाचा थांग यांना नसल्यामुळे
कवचावरती चालवली की इलेक्ट्रिकची गिरमिटे.
जळत्या प्राणवायूच्या निळ्याभोर लेखणीने
अश्वारूढ सेनानीचे कोरले एक विराट शिल्प
जिद्दी अमेरिकी इंजनेरार्टिष्ट हो ! भले शाबास

हॅन्स क्रिश्चन अँडर्सनच्या पुस्तकातून
एक ससा बाहेर पडला वेष बदलून
वेष बदलून छोकरी झाला, वय सहा....
कॅथी इन्ग्रॅम ! (पोरी जरा उभी रहा !)

आता तिने टकाटका पाहिले मला
आणि म्हटले, "कोलांट-उडी येते तुला ?....
नाहीच येणार....माझ्याकडे बघ आता...."
वाक्य पुरे केले उडी घेता घेता !

माथ्यावरच्या झिपऱ्या बटा मागे सारून
कॅथी चढली कोचावरती उडी मारून
तिथून थेट गालिचावर कोसळल्यावर
मला म्हणते, "पापी घे की आवडल्यावर !"

कॅथी, पोरी कुठली तू, मी कोण कुठला
(इथे माझ्या पापणीमधला बांध फुटला)
ती म्हणाली, "एऽ वेड्या रडतोस काय ?"
एवढ्यामध्ये खाली डोके वरती पाय !!

# १४

प्रिय वॉल्ट,
तू तुझ्या कबरीमधेच झोप कसा
पस्तावशील पृथ्वीवरती पुन्हा कधी आलास असा
कबूल आहे तुझीच होती अद्‌भुताची सारी दुनिया
पण तुझे दायाद पडले बिलियनबाज महाबनिया

इलेक्ट्रॉनिक इशाऱ्यावर डोनाल्ड आता क्वॅक करतो
कळसूत्री बाजावरती टेडी बेअर ताल धरतो
खजिन्याच्या बेटावर तर तिकिट काढून खुशाल जावे
हुकमेहुकूम भिण्यासाठी दोन डॉलर जादा द्यावे
ज्याची त्याची भेट घेऊन चाचे प्रेमळ चाचा झाले
वॉल्ट, तुझ्या बालकांचे आत्मे यांनी नागडे केले

तशी तुझी जुनी पत अजूनदेखील आहे मोठी
याही मायाबाजारावर लावली आहे तुझी पाटी
एवढ्यावर तू खूष रहा. अधिक काही मागू नको
जुनीपानी स्वप्ने पहात चिरनिद्रेत जागू नको
तंत्र आणि यंत्र यांची मंत्रशून्य जत्रा पहा
त्रस्त समंधा शांत रहा!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६१
२३६१०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

आंबा पिकतो ऽऽ रस गळतो ऽऽ
'मियामि'ला मी झिम्मा खेळतो ॥

कुठे सकाऽऽळ कुठे दुपाऽऽर
हिरवी माया अपरंपार
फ्लॉरिडाच्या बागा नारंगी
झग्याझग्यांतुन सारंगी
मियामि बंदर
खुळा समुंदर
कोकण समजुन डुचमळतो
'मियामि'ला मी झिम्मा खेळतो ॥

व्हिल्याव्हिल्यातुन फुले गिटार
ठुमकति गौरी झुमकेदार
गौरीचा गाल आमसोलाचा
बंगला मंगलोर कौलांचा
दर्यावर अलबत
झुलतंय गलबत
तसाच आतुन गलबलतो
'मियामि'ला मी झिम्मा खेळतो ॥

# १६

पॅसिफिक ! तुला सगळे आठवेलच कसे आता
अरे आमच्या हिमालयाचा तू अगदी सख्खा भाऊ
आवळेजावळे जुळे तुम्ही, आणि तीच गंमत झाली....
एक झाकला दुसरा काढला, कुणालाच कळले नाही

पॅसिफिक ! अरे तुझ्या बाळपणच्या अंगणामधे
झुंडीनेच फिरत राहिली पोवळ्या-मोतियांची बेटे
ज्वालामुखी कुटुंबातल्या कैक भटक्या पोरांसंगे
रंगे तुमचा खेळ....कधी खो खो कधी झोंबाझोंबी

मग पुढे पिवळ्यागौर टवळ्या आल्या खुदकन् हसत
बांबूंच्या तराफ्यांवर बांबूंचीच वल्ही मारत
आणि पुढे निळ्या निळ्या स्वप्नघड्या तुडवून आल्या
हवाईच्या टंच पोरी हारावलेल्या भारांसकट

असंख्यात शंखशिंपा....चिनी माती....किती चिखल
रिचवलेस किती किती अगस्तीच्या वळणावर
आणि आता झाला आहेस विश्वामधले गहन गूढ
पाताळाचा मानदंड अर्थात पाताळाहून खोल !

जलपरी उसळली वरी तलावाकाठी
बिकिनीत पद्‌मिनी मिरवे अमुच्यासाठी ॥

किति प्रफुल्ल ताजे कमळकळे बेबंद
काचोळी दुबळी चार अंगुळे रुंद
हनुवटीवरुन निथळती चमकते बुंद
लवलवत चालली सुवर्णमय वेताटी ॥

सुकविते सुकन्या उन्हामधे गौरांग
या गौरांगावर तिळतिळ तांबुस वांग
पाहते चपापुन च्यवनऋषींची रांग
काय दर्शनमात्रे फिरेल उलटी साठी ? ॥

हा डँबिस डॉल्फिन जलकन्येचा सखा
उसळून भिडवतो मुख तो सखिच्या मुखा
खिजवून अम्हांला घेतो चुंबनसुखा
ही नार होउनी स्वार फिरे त्या पाठी ॥

अम्हि चौमुलखीचे मुशाफीर दमलेले
घडिभरी पहावी मौज म्हणुन जमलेले
सहकुटुंब केवळ नेत्रसुखीं रमलेले
परि गतजन्मीचे पुण्य केवढे गाठी ! ॥

# १८

आटपाट औरसचौरस लॉसेंजल्स महानगरी
तिच्या अंत:पुरात वसली मयासुराची मायापुरी
हॉलिवुड! कल्पनेच्या तीरावरले गंधमादन
कुबेरांचे क्रीडाभवन किशोरांचे स्वप्नसदन

इथल्या टिचभर अंगणामध्ये विश्व सामावलेले सबंध
कळ दाबा वादळ सुरू कळ दाबा वादळ बंद
जगामधले राजरस्ते वाडे इमले भूतबंगले
हर तऱ्हेच्या बाजारपेठा वाळवंटे बागा जंगले
चुटकीसरशी काही तयार, आगिनगाडी जहाज विमान
हवी तेव्हा जोडून मिळते इंद्रधनुष्याची कमान
देश विदेश राजधान्या नद्या समुद्र पर्वत दऱ्या
एका मयासुरी डबीत चिजा भरल्या आहेत पुऱ्या

देवदत्ता सांभाळ सांभाळ आला गाइड नामक पंडा
तुझ्यासारखा भाविक बघून बघता बघता घालिल गंडा....
'हा गार्बोचा दिवाणखाना....मे वेस्टचा शय्यामहाल
एक जादा डॉलर द्या मग मार्लिनचाही टॉयलेट पहाल!'

विसावे शतक सोडून सोळाव्यात जाण्यासाठी
सॅन फ्रान्सिस्कोची स्ट्रीटकार बरी पडते
उंटाच्या पाठींसारख्या रस्त्यांवरून चढत उतरत
पायीच जातो त्याला तीर्थदर्शन अधिक घडते

कधी कधी रस्त्यामध्येच मध्ययुग भेटू लागते
स्पॅनिश गिटारीचे नाचरे सूर जवळ येतात
खेळकर खिदळणाऱ्या स्तनाढ्य सिनोरिटा
धनाढ्य सिन्योरांना मनसोक्त चुंबन देतात

आपण जावे नाकासमोर मच्छीमार धक्क्यावरती
मेक्सिकनहॅट-जॅकेट-झगे-छत्र्या झिम्मड गर्दी
अंगभर गोंदलेल्या प्रियासहस्रनामावळीत
एकेक भर नोंदून ठेवतात उघडेबंब दर्यावर्दी

अष्टावक्र जिते खेकडे....राशी पडतात त्यांच्या इथे
ताजाताजा भाजून खावा भाल्यावरती त्याला धरून
पंचखंडांमधले दर्दी....कोलंबसही आला असेल....
वॉल्टर रॅले ओळखलात ना चिरूटाच्या वासावरून !

# २०

जगामधल्या जुगाऱ्यांची जगविख्यात राजधानी
लास व्हेगास ! वसवली ही शकुनीच्या वंशजांनी
दिवसा झोपते डाराडूर टक्क जागी असते रात्री
बेदरकार खुन्नस जेव्हा जडते प्रत्येकाच्या गात्रीं

लक्ष्मी थयथय नाचत असते रूलेटवरच्या आकड्यांवर
कालचा सिंहासनस्थ आज रस्त्यावरच्या बाकड्यावर
बाजारबसवी रोषणाई डोळे मोडते सारी रात
जुवामहालात चेटूक चालते निळ्याजांभळ्या अंधारात

अमेरिकन कायदा कडक ! महालांवर असते पाटी....
'एक लाख डॉलर्स आहे अपर लिमिट खेळण्यासाठी !'
हपापलेला देवदत्त तरी येतो एकदा फिरून
घामेजलेल्या हातामध्ये पाच डॉलर्स घट्ट धरून !!

आदिवासी असल्यापासून माणसे हाच खेळ खेळतात
खुळखुळ खुळखुळ दोन फासे कसे खूळ लावत असतात
उठा उठा हो सकळिक ! शकुनीची अवलाद येईल
हातामधले खिशामधले पाकिटातले काढून घेईल !!

बाळपणापासून जेनी जुगाऱ्यांत वाढली आहे
अनेकांची इस्टेट तिने लिलावात काढली आहे....
हिचा बाप कोण बोला ! दोन डॉलर : लंगडा जॅक !
कुबडा जॉन : तीन डॉलर ! तीन डॉलर ? आपण पॅक !!

आईबापांविना जेव्हा जेनी वयामधे आली
जुवेबाज शिकाऱ्यांत पुन्हा एकदा शर्यत झाली....
हिचे अचूक माप काढा ! पस्तीस-बावीस-पस्तीस !
हरलात राव दहा डॉलर....छत्तीस-वीस-छत्तीस !!

जेनी पुढे प्रेमात पडली आणि तिचे लगीन झाले
अस्सल लास व्हेगासकर चर्चमधे लग्ना आले....
वर्षाआत घटस्फोट ! पैज लागली ? दहा डॉलर !
पैज जिंकला त्याची झाली खरोखरी ताठ कॉलर !!

व्हायचे तेच झाले होते, गर्भार राहिली होती जेनी....
मुलगा झाल्यास शंभर डॉलर : मुलगी झाल्यास एक पेनी !
पेनी जिंकली ! जेनी मात्र मरून गेली त्याच वेळी....
हिचा बाप कोण बोला ! सुरू झाली दुसरी खेळी !!

# २२

स्वदेशाहून तिप्पट मोठ्या परक्या देशी
हरवलेल्या भावा! तुला कुठे शोधू
बेचाळीस बापजादे मरून गेले
आई मात्र अजून वाट पहाते आहे!

वाट-चुकल्या कोलंबसने चुकून तुला
मीच समजून एकदा हाक मारली होती
जाम त्याला ओळख म्हणून दिली नाहीस
आता मीच जाहिरात देतो अमेरिकेत—

‘तांब्यासारखी कांती....सरळ लांब केस....
सरळ नाक....बारीक डोळे....पातळ ओठ....
पाठीवरती भाता....पीस माथ्यावरती....
असा आमचा भाऊ कुठे दिसला काय?

अरिझोना विंचरला, पण पत्ता नाही
न्यू मेक्सिकोमधे कुणा दिसला नाही
झुनी....ताओस....विचिता अन् इडाहो....
त्याचा पत्ता सापडतो का पहा हो!’

एकच आले उत्तर, तेही त्याचेच बहुधा
तो म्हणतो : दादा आता रस्ता साधा !
तो पुसतो : इतके दिवस काय केलेत ?
दळभद्री हो, फार उशिरा आठवण झाली !

स्पॅनिश राक्षसांशी आम्ही झुंज दिली
फ्रेंच हरले, इंग्रजांच्या नाकी नऊ
त्याच्यानंतर आमचे सौप्तिकपर्व झाले
तेव्हा तुम्ही कोठे होता मोठे भाऊ ?

आमची पोरकी पोरे झाली परागंदा
अकोमाच्या शिखरावरून अजून पहा
अरापाहो पोहून गेले कोलॅरॅडो....
क्रोऽऽ, बॅन्नॉक, नवाजो तर नामशेष !

इलदेफांसो....अनादार्को....सगळीकडे
मरेपर्यंत लढत राहिला बभ्रुवाहन
आता फुका शोधू नका देशोदेशीं
अमेरिकन रक्तात आम्ही लाल पेशी !!

# २४

ग्रँड कॅन्यॉन करायची रीत तशी सोपी असते
सह्याद्रीचे तीनचार घाट कानशीने तासा नुसते
झाडपाला झाडा आणि खडककातळ फेकून द्या
खाली माथा वर पायथा असे उलटे ठेवून द्या

जोत्यासाठी बोरघाट वरा, त्याच्यावरती मानमोडी
रायगडासह रडतोंडी उरावरती ठेवा जोडी
या सर्वांवर इस्त्री मारा, आडवा करा उभा कडा
वादळाचा रंधा फिरवून ग्रँड कॅन्यॉन करा खडा

आता राहिली विरुद्ध बाजू, त्याच्यासाठी एक करा
हिमालयाचा पायथा आणून चिऱ्यावरती ठेवा चिरा
वर पेरा उदी पिवळी राजस्थानी रंगीत रेती
मऊसूत जाडीभरडी सरमिसळ करा रे ती

आता हवी कोलॅरॅडो पाताळगंगा कर्वतकाठी
नर्मदा अन् अलकनंदा करा मिश्रण त्याच्यासाठी
जिन्नस तयार....मात्र शेवटी शोभा म्हणून माथ्यावर
चेरीसारखा खोचून द्या रेड इंडियन वॉच टॉवर!

तळघरात दडवलेले काळे कभिन्न शहर
जहर जसे जपलेले कुलुपबंद कपाटात
फरसबंद जमिनीवर उगवेलच कसे काही?
रोगट प्रकाशाचे सिंथेटिक काळे आकाश
मंद मंद रोषणाई कोमट कोमट हवामान
रात्र आणि दिवस यांचा लिंगभेद मावळलेला

काळ्याशार पोलादाचे हलते झुलते पुतळे पुरुष
टोकेरी स्तनाग्रांच्या पोरी जशा शिसवी बाहुल्या
सावल्या स्पष्ट उमटलेल्या विरघळलेल्या अंधारात
एबनीचे दाट जंगल भुताटकीने झपाटलेले
भेदरलेले भेदक डोळे, खिंकाळल्यागत अश्वहास्य
आत्मरक्षण करण्यासाठी आक्रमक मुद्रा यांची....

चला चला मुशाफिर हो! चला, खास तुमच्याखातर
आम्ही राखून ठेवले आहे गतशतकातले चिडियाघर!
पहा....सगळे मद्य पितील, गातील, बोंगो वाजवतील,
नाचतील आणि मिठ्या मारतील, हवे तर जुगतीलदेखील!

# २६

शिकागो ! मला तुझी भीती वाटते
सांज दाटते रानमांजरी पावलांनी
खुपसू नको खंजिरांचे हिरवे डोळे
सावजावरती एकवार दया कर....

....परवा एका म्हातारीला, शिकागो
ठार मारले चार खेळकर पोरांनी
शेंडेफळ चोरांनी जर पाकिट मारले
शिकागो ! मी शरमेनेच मरून जाईन....

....नको तुझ्या लिंकनमधली मोफत राइड
नको दाबूस पाठीमागून माझा गळा....
शिकागो ! तू गळ्याशपथ खरे सांग
ते चौघे काय बरे कुजबुजताहेत ?

शिकागो....ते बायोनेटचे खुनशी बोट....
शिकागो....ते गुत्त्यामधले घोगरे हासू....
शिकारीचे काळे कुत्रे....शिकागो....
शिकागो....तू आधी काढ तो काळा चश्मा !

"कबूल आहे, अटलांटिकच्या पल्याड इंग्रज राजा आहे
अमेरिका त्याची नाही ! हा देश माझा आहे

जनरल थॉमस गेजजवळ दोन हजार फौज होती
आम्ही हत्यार घेतले नव्हते तोवर त्याची मौज होती
आम्ही म्हणजे नवी भूमी पिकवणारे शेतमजूर
त्याला वाटले हुकूम करताच आम्ही म्हणू जी हुजूर
कल्पनाच नव्हती त्याला किसान हाती हत्यार घेतील
स्वातंत्र्याची किंमत म्हणून हसत हसत प्राण देतील

साम्राज्याची ध्वजा आपल्या खांद्यावर मिरवत आले
अकस्मात बंडखोर बंदुकांचे बार झाले
स्वामिभक्तां कळला नाही स्वातंत्र्याचा चेव कसा
आमच्या खुनासाठी त्यांच्या तापल्या धंदेवाईक नसा

होले आणि ससाण्यांची वेडी झुंज सुरू झाली
दुसरा होला उभा राही पहिला जिथे पडेल खाली
कॉंकॉर्डच्या या पुलावरून ससाण्यांचा हरला थवा
जन्मा आला देश नवा !"

“नव्या जगाच्या छाताडावर जहाजांवरच्या तोफा रोखून
साम्राज्याचा झेंडा होता दर्यावरती आब राखून
भुकेकंगाल खाणमजूर खानदानशून्य ठेकेदार
विशाद काय बंड करतील! भुईसपाट होतील पार

....एकाएकी आरमाराचा पहारा चुकवून हातोहात
बंकरहिलवर उभी राहिली तटबंदी रातोरात
सतरा जून पंचाहत्तर....अर्भकाचा जन्म झाला
तोच कोवळ्या गळ्यावरती प्राणघातक पडला घाला

चार जर्नेल धावून आले, घेरा घातला चहूकडून
एकटा अभिमन्यू तरी किती लढेल लढून लढून
इंग्रजांच्या चक्रव्यूहात पिंजून गेली त्याची छाती
मात्र रणात पडण्यापूर्वी अडीचशेंना चारली माती....”

बॉस्टनवाले! तुमची मुद्रा फुलून येते कथा सांगता
हाच न्याय लावीत चला आजदेखील इतरांकरता
तुमच्या अजिंक्य ध्वजावरचे अढळ असोत सारे तारे
आशियाई आफ्रिकाई अर्भकांना जपाल ना रे?

कर्तव्याच्या भावनेने मघाचा तो बसवाला
केप कॉडच्या थांब्यावरती मला सोडून पसार झाला
केप कॉड ! निर्मनुष्य वाडी एक दर्याकाठी
शहरात फार गर्दी झाली एवढी वर्दी देण्यासाठी

किती निर्विकार समुद्र, रेती किती सुकी सुकी
कसल्या भीतीमुळे बरे घरे झाली मुकी मुकी
एक रस्ता चिडीचूप....कुठून आला ? कुठे गेला ?
म्हणतात एका कुबेराने इथे एक खून केला

भस्मचर्चित सिल्व्हर ओक वल्कलात लपेटलेले
त्यांना आज अनेक वर्षे पक्षी नाहीत भेटलेले
तरी बरे कोणी तरी इथे चर्च बांधले आहे
विजनाचे स्वजनांशी नाते त्याने सांधले आहे

क्षितिजाला छेद देतात गलबतांची बंकिम शिडे
विसंगत भुणभुण करीत एक हेलिकॉप्टर उडे
वहिवाटीची एवढीच खूण....तेवढी काय कमी आहे ?
तीच शापित सौंदर्याला उःशापाची हमी आहे !

## ३०

मंद सूर्यास्ताची वेळ धुंद संगीताचा मेळ आम्ही रंगलो पुरे
पेले किणकिणत हाती कुणी टॅरांटेला गाती जरा झिंगलो खरे
होते यजमान थंड त्यांना आळस उदंड आणि डोळ्यांवरी नीज
त्यांची घरवाली मात्र भरी प्रत्येकाचे पात्र जशी लवलवे वीज
जमे पाहुण्यांचा मेळा फुटे हासू वेळोवेळा कधी चुंबन मिठी
कधी कडकडून टाळी कधी अस्फुट आरोळी कधी कर्कश शिटी
असा जंगी गदारोळ उठे तारुण्य-कल्लोळ टॅमी उभी राहिली
अशी मोकळीझाकळी उरिं गुलाबपाकळी आम्ही नाही पाहिली

टॅमी उभी राहिली टॅमी गाऊ लागली टॅमी नाचू लागली
सभा उभी राहिली सभा गाऊ लागली सभा नाचू लागली
तिची चाल गिर्रेबाज तिचा मांसल आवाज तिच्या डोळ्यांत आव्हान
तिचे सोनियाचे केश त्यांना बंध नाही लेश तेही नाचती बेभान
दिवे मंद मंद झाले छाया भिंतीवर हाले सारी थकली सभा
एक कापुरवाहुली तरी नाचत राहिली तिची आगळी प्रभा

येते अधूनमधून सय टॅमीची अजून आणि आठवे मला....
लललाला लालालला लललाला लालालला लललालाऽ लाऽलला

## ३१

औट घटकेची यात्रा आणि विदेशी शेजार
सखी शेजारणी बाई किती करिशी बेजार !

छटाकी ही नटारंगी झगा आखूड नेसते
लख्ख दुधाळ दातांनी कशी मधाळ हासते
हिचे अर्धचिनी डोळे त्यांचे कटाक्ष चोरटे
केस पिंगट कुरळे दंड उघडे गोरटे
रुळे मोकळ्या गळ्यात पोवळ्यांची बोरमाळ
मधे बदामी लॉकेट अडमडे लडिवाळ
लावी योजनगंधा ही किती मादक अत्तर
जळे फाजील दर्पाचा हाती ब्राझिली सिगार

कशी भाबडी बोबडी धड इंग्रजी येईना
तरी प्रश्न पुसू पुसू स्वस्थ बसूही देईना
"इंदिया यू? यू इंदिया? मेनी मेनी एलिफन्त?
हाऊ मेनी काऊ, कोब्रा, महाराजा, गुरू, सेन्त?
यू तीच् मी रोप् त्रिक्? यू तीच् मी युवर योगा?"
योगिराज देवदत्ता ! जे ये वाट्याला ते भोगा !!

# ३२

ती म्हणाली, "आम्ही आलो सत्तर साली
बहात्तरच्या फॉलमध्ये बेबी झाली
त्यानंतर यांना मोठ्ठा जॉब लागला
लोनबीन सगळा हिशोब एकदम भागला
आता तर काय फॉर्टीथौजंड वर्षाकाठी
वर थोडा भत्ता असतो बंगलोसाठी
यांची एक, माझी एक, दोन गाड्या
मजा म्हणजे इथे मिळतात झक्क साड्या!
शिल्लक मात्र शून्य बरं का....नवल नाय
स्टेटस् म्हणजे एक्सपेन्स कमी असतो काय?
तशात अहो गंमत झाली गेल्या साली
चेरी ब्लॉसम सीझनमधे 'पिंकी' आली!
हे मात्र ग्रेट, यांनी अडचण जाणली
बेबी सिटिंगसाठी आपली मम्मीच आणली!
मम्मी कुक! मम्मी नॅनी! बेबी सिटर!
बचत झाली, तेवढ्यात आणली नवी मोटर!!"

तो म्हणाला, "इंडियात ठेवलंय काय
सगळी साली रडारड अन् हाय हाय !
वशिल्याशिवाय जॉब ब्लडी देतो कोण
काही म्हणा, आपले लोक आळशी ढोण
करप्शनची कमाल नुसती....स्टुपिड साले
तूच सांग फ्रीडमनंतर काय झाले ?
कधी वाटतं जावं तिकडे....तेवढ्यापुरतं....
आपल्यासाठी इंडियात कोण झुरतं ?
फार फार तर डॅडी-मम्मी ओल्ड म्हणून
शेदोनशे डॉलर धाडतो अधूनमधून
त्यांना वाटतं चैनीत असतील राजाराणी
त्यांना कशी दिसणार आमची बैलघाणी
त्यांना आमच्या गाडया दिसतात, घर दिसतं
जॉब नसता दोघांना तर जमलं असतं ?
इंडियात बैलगाडया....कचरा....शेण....
वर ओरड....अमेरिकेत ब्रेनड्रेन !!"

# ३४

अमेरिकन शेतकरी भाऊ! तुम्ही केवढे तालेवार
उगवतीला मावळतीला पघावं ते हिरवंगार
एवढा थोरला बारदाना, चारच गडी त्याच्या पाठी
औजारं बी नामी तुमची पेरनी-कापनी-मळनीसाठी
मिशिशिप्पी नदी म्हंजी इमानदार कामवाली
पानी भरती, चक्की पिसती, बिजलीबत्ती तिनंच केली
म्यां म्हनलं ह्यो राक्किस कोन....तर ती फवारनीची चक्की
निस्तं योक बटन दाबा, फसाफसा उडवी फक्की
गाया मस्त दूध देत्यात, बैलं कापून खाता म्हनं
अगडबंब गोदामांतनं खंडी खंडी भरता दानं
गहू म्हना भुइमुग म्हना समदं बख्खळ पिकत असंल
बाजाराची कटकट न्हाई, सॅमकाकाच इकत असंल

सूटबूट ह्याट पाइप....आयला कामं होत्यात कशी?
तुमची पोरं झाकूबाज शिरमंतांची असत्यात तशी
आमच्या गवनेराला नसतं असं आंगन हिरवंकंच
असा बंगला अशी मोटार अशी बायकू गोरी टंच!

पाणी! आदिमायेच्या मायेएवढे अजस्र
सहस्र हिरण्यगर्भ लीलया सामावणारे
पाणी! आंधळे हिस्टेरिकल पिसाट
सुसाट वासनेने पाताळभर कोसळणारे
पाणी! आदिम पाण्यासारखे अकलंक
अव्याहत काळाचा महाघोष घुमवणारे
असंख्य सप्तकांच्या अवरोही खर्जामधून
मुळारंभ वेदनेच्या मुळापाशी पोचणारे
पाणी! घणाघाती. निरागस शुद्ध क्रौर्य
आपल्यासकट महाभूते चूर्ण करू बघणारे
पाताळस्थ शंकराच्या विचित्र साधनेसाठी
विपरीत ॐकाराचा अखंड जप करणारे
पाणी! पाण्यामधून पाण्यामधे रोरावणारे
उसळपिसळणारे सुखवदुखवणारे
बर्फाळवाफाळणारे निववपेटवणारे
पाणी! मृत्यूचा मॉर्फिया देत जिववणारे....

अलाण्याच्या ब्रशावरती फलाण्याचे दंतमंजन
अलबत्याचे अंडरवेअर गलबत्याचे थोबाडरंजन
लिलीसारख्या त्वचेसाठी लिली ब्रँड साबणजेली
चरबी हटवा वजन घटवा हजारोंनी खात्री केली
केंटुकीच्या कोंबडीवरती फेंटुकीचे मोहरीचाटण
डबलडेकर सँडविचमध्ये बबलछाप मटणघाटण
पिझ्झा हट्‌चा पिझ्झा खा मॅपलज्यूस ॲपलपाय
अमुक डोनट तमुक पीनट अजून खाल्ले नाहीत काय ?
अ ब क ड ई फ ग ऽऽ तयार घरे सात टाइप्स
रेडीमेड खिडक्या दारे भिंती छपरे गटरपाइप्स
होटेल मोटेल खेटर मोटर....देशभर करा प्रवास
एकच रूप एकच रंग एकच रुची एकच वास
आकाशवाणी घटवत असते दूरदर्शन पटवत असते
जहांबाज जाहिरातशाही गिऱ्हाइकांना गटवत असते

अजब देश ! गजब तऱ्हा ! व्यक्तीवरती सक्ती नाही....
सहस्रशीर्षा पुरुषा ! तुझी गणवेषातून मुक्ती नाही !

यलोस्टोन नॅशनल पार्क दूर राहिला
पर्वतातला शिल्पसज्जा नाही पाहिला
मात्र दिसली अंकल सॅमची भव्य मूर्ती
अणुभंगाची छत्री तिच्या माथ्यावरती
पॉलिस्टरचा डॉलरछाप शर्ट अंगी
छाताडावर रुंद टाय भडकरंगी
ढेर पोट. त्याच्याखाली फनेल इजार
पायात बूट पंचखंड चिरडणार
बुधला भरून कोकाकोला डाव्या हाती
उजवा हात जायंट व्हीलच्या बटनावरती
चला सगळे गोरे काळे पिवळे पिंगे
पाळण्यांमध्ये घट्ट बसा संगे संगे
त्याच्या मनात येताक्षणी दावील कळ
तेव्हा कळेल त्याच्या जायंट व्हीलचे बळ
त्याचे तंत्र त्याची लहर तोच जाणतो
सगळी पृथ्वी स्वर्गात नेऊन खाली आणतो

भटो भटो काय आणलंत या प्रश्नांची फैर झडेल
तेव्हा उत्तर देता देता केवढी आपली धांदल उडेल
एवढ्यासाठी उरलेसुरले डॉलर खिशामध्ये भरून
सुपर मार्केटवरती गेला देवदत्त चाल करून

धीर धरून म्हणत राहिला हे दाखवा ते काढा
त्याच्या दुर्दैवाने त्याला येत होता नऊचा पाढा
दहा डॉलर म्हंजे आपले नव्वद रुपये झाले चक्क
हाती उरले मायाबाजार बघून फक्त होणे थक्क

कुटुंबिनीसाठी त्याला घ्यायची होती एक साडी
शेजारणीच्या बाळासाठी खेळण्यामधली मोटरगाडी
सासऱ्यासाठी शिव्हास रीगल मित्रासाठी सिग्रेटकेस
छोट्या नातवासाठी न्यावा एक तरी सुंदर ड्रेस
खरे तर स्वतासाठी फौंटनपेन टाइपरायटर
आपल्या थोरल्या पोरासाठी शानदार छोटा लायटर

नऊ एके नऊ म्हणत भांडवलदार राहिले उभे
हातात चार चित्रकार्डे आणि पाच प्लॅस्टिक डबे !

# ३९

बायबाय अमेरिका बायबाय देवदत्त
त्याच्या मनात निरोपाची एवढी परवल होती फक्त
व्हाइटहाउसच्या पायऱ्यांवरती तिने त्याचे चुंबन घेतले
गुबगुबीत पंजात त्याचा हात धरून आत खेचले
गर्भमखमलीच्या दिवाणखान्यात नेले थेट
त्याला गिळून टाकण्यासाठी तिथे होता सोफासेट
तो त्याच्या काठावरती जेमतेम टेकला असेल मात्र
ती म्हणाली घाई काय....रहा अजून एक रात्र
सोनपिंगे केस तिचे, हस्तिदंती सुबक मान
नायलॉनच्या निळ्या लाटांत तिची मेदोन्मत्त शान
माहेरसासर श्रीमंत जिचे तिची असते अशी काया
पोर्शिंदेपण जाहीर करतो तिचा जगज्जेता फाया

नकोनको–हवीहवी अशी मादक ऊब झटकीत
सावध देवदत्त उठला रितेरिते खिसे चाचपीत
जिवणी आकर्ण फाकून तीही निरोपाचे हसली
तेव्हादेखील तिच्या मुखात प्लॅटिनमची कवळी दिसली !

पाठीवरचे गाठोडे चिजांनी भरले तरी
परतणारा यात्रिक रितारिता परत येतो
विदेशी वाऱ्याला सोकावलेल्या पंखांना
स्वदेशी वावटळीची पुन्हा सय करून देतो

सोन्याच्या द्वारकेत शहाण्याने जाऊच नये
आपले घरअंगण अधिकच कंगाल दिसते
पुन्हा पाय ठेवीपर्यंत सर्व व्हावे सोनियाचे
प्रत्येक सुदाम्याचे एवढे भागधेय नसते

समुद्र ओलांडून स्वदेशात पाऊल ठेवले
तेव्हा रत्नमालेजागी उरली शुद्ध रुद्राक्षे
'दुर्लभं भारते जन्म' हा मंत्र म्हणून
इसापनीतीमधली चाखावी आंबट द्राक्षे

"बोला, बहुमोल काय काय आणले आहे?'
नेहमीचाच करोल प्रश्न तीर होऊन घुसतो
आलेला हुंदका कसाबसा दाबून ठेवून
उसन्या उत्साहाने देवदत्त फक्त हसतो

REFBK-0023610
REFBK-00236